“उच्च शिक्षण आणि शाश्वत विकास विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय परिषद”

आयोजक:
अर्थशास्त्र, वाणिज्य, मराठी आणि संगणक विज्ञान विभाग
मामासाहेब मोहोळ महाविद्यालय

# “उद्योजकता शिक्षण आणि शाश्वत विकास उद्दिष्ट ८ (सन्मानजनक रोजगार आणि आर्थिक वाढ) ”

लेखक

प्रा . मनिषा राजेश खंडाळे

सहाय्यक प्राध्यापक

मामासाहेब मोहोळ महाविद्यालय , पौड रोड, पुणे ३८

१. सारांश :

शाश्वत विकास ध्येय ८ चे उद्दीष्ट समावेशक आणि शाश्वत आर्थिक वाढ, पूर्ण आणि उत्पादक रोजगार आणि नैतिक कामाला प्रोत्साहन देणे आहे. ते उद्योजकता आणि रोजगार निर्मितीला प्रोत्साहन देण्याचे महत्व अधोरेखित करते. या संशोधनाचा उद्देश उच्च शिक्षणातील उद्योजकता शिक्षणाचा शाश्वत विकास उद्दीष्ट साध्य करण्यात असलेला प्रभाव अभ्यासणे हा आहे. या अभ्यासासाठी मामासाहेब मोहोळ महाविद्यालयातील विदयार्थ्यांकडून प्रश्नावलीद्वारे माहीती संकलित करण्यात आली. महाविद्यालयातील प्रत्येक विभागाच्या विद्यार्थ्यांना गुगल फॉर्म तयार करून पाठवण्यात आला . संकलित माहीतीचे विश्लेषण टक्केवारी पद्धतीने करण्यात आले .

संशोधन निष्कर्षानुसार महाविद्यालयातील अभ्यासक्रम हा रोजगाराभिमुख आहे . उद्योजकता अभ्यासक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकास , नवकल्पना आणि उद्योजकतेची जाणीव वाढते त्यामुळे सन्मानजनक रोजगाराच्या संधी निर्माण होण्यास मदत होते . या निष्कर्षावरून उच्च शिक्षणातील उद्योजकता शिक्षणाचा शाश्वत विकास उद्दीष्ट साध्य करण्यात प्रभाव असल्याचे स्पष्ट होते .

२. परिचय :

आजच्या काळात रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकास हि प्रत्येक देशासमोरील महत्वाचे आव्हान आहे या समस्येवर उपाय म्हणून शाश्वत विकास उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली आहेत . शाश्वत विकास उद्दिष्टे ही १७ जागतिक उद्दिष्टे आहेत जी २०१५ मध्ये सर्व संयुक्त राष्ट्र सदस्य राष्ट्रांनी शाश्वत विकासाच्या २०३० च्या अजेंडाचा भाग म्हणून स्वीकारलीसंशोधन ., दर्जेदार शिक्षण आणि नवोपक्रमांना प्रोत्साहन देऊन शाश्वत विकास उद्दिष्टांसाठी विद्यापीठे महत्त्वाची आहेत ती .नागरी समाजाचा अविभाज्य भाग आहेत आणि जागतिक आणि स्थानिक भागीदारीला प्रोत्साहन देतात. या उद्दिष्टांमधील आठवे उद्दिष्ट सन्मानजनक रोजगार आणि आर्थिक वाढ याला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. उच्च शिक्षण संस्था विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता कौशल्य विकसित करून रोजगार निर्मितीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतातउद्योजकता अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक ज्ञान ., कौशल्ये आणि आत्मविश्वास प्रदान करतात.

३. मुख्य शब्द :

१. उद्योजकता शिक्षण

२. शाश्वत विकास उद्दिष्ट

३. सन्मानजनक रोजगार

४. आर्थिक वाढ

५. कौशल्य विकास

६. उद्योजकता विकास

७. उच्च शिक्षण

४ . अभ्यासाची उद्दीष्ट्ये :

१. शाश्वत विकास उद्दिष्टांबद्दल विद्यार्थ्यांची जागरूकता अभ्यासणे.

२ . कौशल्य प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या रोजगार क्षमतेतील बदल अभ्यासणे .

३ . उद्योजकता शिक्षणाचा सन्मानजनक रोजगार निर्माण करण्यामध्ये असलेला सहभाग समजून घेणे.

४. महाविद्यालयातील उद्योजकता संबंधित अभ्यासक्रमांचा शाश्वत विकास उद्दिष्ट ८ साध्य करण्यात होणारा उपयोग तपासणे.

५ . संशोधन पद्धती :

- संशोधन रचना : केस स्टडी पद्धत
- अभ्यास क्षेत्र : मामासाहेब मोहोळ महाविद्यालय, पुणे
- नमुना आकार : ६९ विद्यार्थी
- माहिती संकलन पद्धत : प्रश्नावली
- नमुना निवड पद्धत : यादृच्छिक नमुना निवड पद्धत
- माहिती विश्लेषण : टक्केवारी पद्धत

६. संशोधनाच्या मर्यादा :

1. प्रस्तुत संशोधन फक्त मामासाहेब मोहोळ महाविद्यालयापुरते मर्यादित आहे, त्यामुळे त्याचे निष्कर्ष सर्व महाविद्यालयांना लागू होतीलच असे नाही.
2. या अभ्यासासाठी मर्यादित संख्येतील विद्यार्थ्यांकडून माहिती संकलित करण्यात आली आहे.
3. माहिती संकलनासाठी प्रश्नावली (Google Form) या पद्धतीचा वापर करण्यात आला असल्याने काही प्रतिसाद पूर्णपणे अचूक नसण्याची शक्यता आहे.
4. संशोधनात टक्केवारी पद्धतीने विश्लेषण करण्यात आले असून इतर प्रगत सांख्यिकी पद्धतींचा वापर करण्यात आलेला नाही.
5. या अभ्यासात फक्त विद्यार्थ्यांचे मत विचारात घेण्यात आले असून शिक्षक किंवा उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांचे मत समाविष्ट करण्यात आलेले नाही.

### ७ . माहिती विश्लेषण :

| अ. क्र . | प्रश्न | हो | नाही |
|---|---|---|---|
| १ | SDG 8 (सन्मानजनक रोजगार व आर्थिक वाढबद्दल माहिती आहे का (? | ८२.६% | १७.४% |
| २ | महाविद्यालयात SDGs विषयी कार्यक्रम कार्यशाळा/घेतल्या जातात का? | ८८.४% | ११.६% |
| ३ | कौशल्य विकास )Skill Development) कार्यक्रमांमध्ये आपण सहभागी झालाझाली आहात का/? | ८७% | १३% |
| ४ | कौशल्य प्रशिक्षणामुळे माझी रोजगारक्षमता वाढली आहे. | ८९.९% | १०.१% |

### ८ . निष्कर्ष (Finding) :

१. कौशल्य विकास कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग आहे .
२. विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता अभ्यासक्रमाबद्दल चांगली जागरूकता आहे.
३. विद्यार्थ्यांमध्ये नवीन व्यवसाय कल्पना विकसित होण्यास उद्योजकता शिक्षण मदत करते.
४. कौशल्य विकास कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांची रोजगारक्षमता वाढते.
५. उद्योजकता शिक्षणाचा आर्थिक वाढ आणि रोजगार निर्मितीवर होणारा प्रभाव अभ्यासणे.

**९. निष्कर्ष(Conclusion)**

**उच्च शिक्षण संस्थांमध्ये उद्योजकता अभ्यासक्रमांचा समावेश केल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवकल्पना आणि व्यवसायिक कौशल्य विकसित होतात त्यामुळे रोजगाराच्या संधी वाढतात .आणि आर्थिक विकास साध्य होण्यास मदत होते त्यामुळे शाश्वत विकास उद्दिष्टे साध्य करण्यासाठी उद्योजकता शिक्षण अत्यंत महत्वाचे आहे .**

**१०. संदर्भ :**

**१. पुस्तके**

**उदा. शाश्वत विकास, उद्योजकता, अर्थशास्त्र यावरची पुस्तके.**

**२. संशोधन लेख / जर्नल**

**उदा. Google Scholar मधील लेख.**

**३. वेबसाईट**

- **अधिकृत SDG वेबसाइट**
- **United Nations**